**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३६/२०२६ मधील नि.क्र.१ खालील आदेश</u>**

**<u>धोंडीराम वि. शासन</u>**

<u>CNR No.MHLA060004622026</u>

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार नामे **धोंडीराम मनोहर गुणाले** यांनी बी.एन.एस.एस. चे कलम ५०३ प्रमाणे गुन्हयात जप्त जेसीबीचा अंतरीम ताबा मिळणेकामी दाखल केला आहे.

२. अर्जातील मजकूर असा की, अहमदपूर पोलीस स्टेशन अंतर्गत गु.र.नं.९१/२०२६ बी.एन.एस. चे कलम ३०३ (२), ३(५) व कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये दाखल गुन्हयामध्ये अर्जदाराच्या मालकीचे जे.सी.बी मॉडेल क्र.JCB 3DX ही खालील वर्णनाचे वाहन जप्त करण्यात आलेले आहे. त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे;

| | | |
|---|---|---|
| रजिस्ट्रेशन नंबर | : - | MH-22-BC-5048 |
| चेसिस नंबर | : - | HAR3DXSSC02816117 |
| इंजिन नंबर | :- | H00244930 |

सदर वाहन अर्जदाराच्या मालकीचे असून त्यांना त्याची दैनंदिन कामकाजासाठी गरज असते. वाहन पोलीस स्टेशनमध्ये उघड्या अवस्थेत पडून राहिल्यास त्याचे नुकसान होण्याची शक्यता आहे. सबब, त्यांनी वाहनाचा अंतरीम ताबा मिळण्याची विनंती केली आहे.

३. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी अर्जास हरकत घेतलेली असून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जप्त मुद्देमाल (जे.सी.बी. मशीन) हा गंभीर प्रकारच्या गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेला आहे. अर्जदारास वाहनाचा ताबा दिल्यास तो त्याचा वापर अशा प्रकारच्या गुन्ह्यात पुन्हा करण्याची शक्यता आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. तपासी अंमलदार यांनी नि.५ खाली म्हणणे दिले आहे. त्यांनी वाहन अर्जदाराच्या ताब्यात देण्याबाबत योग्य ते आदेश पारित करण्याची विनंती केली आहे.

५. अर्जदाराने अर्जाच्या पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र, आर.सी. बुकची छायांकित प्रत, विमा पॉलीसीची छायांकित प्रत, आधारकार्डची छायांकीत प्रत व प्रथम खबर अहवालाची छायांकीत प्रत अशी कागदपत्रे दाखल केली आहेत. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन तो वाहन क्र. MH-22-BC-5048 चा मालक असल्याचे स्पष्ट होते. गुन्हयाचे स्वरुप पाहता वाहनाचा ताबा संपरिक्षेदरम्यान अर्जदाराकडे दिल्यास त्याचा परिणाम संपरिक्षेवर होण्याची शक्यता दिसत

नाही.

**६.** सदर वाहन पोलीस स्टेशनमध्ये ठेवून त्याचे नुकसान होणार आहे. सदर वाहन अर्जदाराच्या मालकीचे असल्याने अर्जदाराने/आरोपीने योग्य तो पुरावा दिलेला आहे. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज काही शर्तीवर व अटींवर मंजूर होणेस पात्र आहे. म्हणून मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज खालील अटी व शर्तीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदाराला अहमदपूर पोलीसांनी गु.र.नं.९१/२०२६ अन्वये बी.एन.एस. चे कलम ३०३ (२), ३(५) सह कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये जप्त जे.सी.बी मॉडेल क्र.JCB 3DX हे वाहन ज्याचा रजिस्ट्रेशन नंबर **MH-22-BC-5048** असा आहे. त्याचा अंतरीम ताबा खालील शर्ती व अटींच्या अधीन राहून देण्यात यावा.

३. अर्जदाराने रक्कम रुपये ३०,००,०००/– (रुपये तिस लाख रुपये फक्त) चा निरीक्षणग्रह बंधपत्र सादर करावे. आरोपीने सदर वाहनाचे मूळ स्वरुप, रंग बदलू नये अथवा वाहन इतर कोणासही हस्तांतरीत अथवा तबदिली करु नये तसेच या न्यायालयात आवश्यकता वाटल्यास न्यायालयाचे आदेशान्वये जप्त वाहन न्यायालयात हजर ठेवावे.

४. अर्जदार या न्यायालयाने अथवा या न्यायालयाच्या वरिष्ठ न्यायालयाने दिलेल्या निर्देशावरुन उपरोक्त नमुद वाहन हजर करण्यास असमर्थ ठरल्यास रक्कम रुपये ३०,००,०००/– (रुपये तीस लाख रुपये फक्त) या न्यायालयात हजर ठेवावे.

५. तपासी अधिकारी यांनी सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात देतेवेळी अर्जदाराच्या खर्चाचे सदर जप्त वाहनाचे फोटो काढावे, फोटोवर अर्जदाराची स्वाक्षरी घ्यावी व पंचनामा करावा. सदर पंचनामा व फोटो न्यायालयात दाखल करावे.

६. येणेप्रमाणे यादी देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.03.17 15:32:57 +0530

दिनांक : – १६.०३.२०२६.

**(श्रीमती एस.डी. वडगांवकर)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अहमदपूर.
(कोर्ट क्र.०१)